# राष्ट्रीय चर्चासत्र

शुक्रवार दि. १४/०३/२०१४ आणि शनिवार दि. १५/०३/२०१४


## 'बदलती प्रसार माध्यमे आणि साहित्य व्यवहार'

**गुरूवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे**
**वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, सिन्नर**

ता.सिन्नर, जि. नाशिक - ४२२ १०३. (महाराष्ट्र)

आयोजित आणि

**महाविद्यालये आणि विद्यापीठ विकास मंडळ, पुणे विद्यापीठ पुरस्कृत**



*Seminar Proceeding*

IJORS LL
ISSN : 2321 - 0133 (Print)

Indian Journal(s) of Research Studies (IJORS) in Languages & Literature [ISSN: 2321-0133 (Print)]
[Volume II, Issue 1& 2] [January –April, 2014]

# मराठी वर्तमानपत्रे आणि मराठी साहित्य व्यवहार प्रसारमाध्यमे

- प्रा. श्रीमती सरोजिनी खैरनार
म. वि. प्र. चे कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, ओझर मिग, नाशिक

वर्तमानपत्र हे दृश्य माध्यम आहे. त्याद्वारे आपण आपले विचार सविस्तरपणे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवू शकतो. जसा वेळ मिळेल त्याप्रमाणे वाचकाला त्याचे वाचन करता येते. असे असले तरी निरक्षर लोकांना मात्र या माध्यमाचा फायदा होत नाही. 'आजचे वर्तमानपत्र म्हणजे उद्याची रद्दी' असे म्हटले जाते; त्यावरुनच त्यांचे क्षणभंगुरत्व लक्षात येते. तरीही उद्याची रद्दी असलेले हे वर्तमानपत्र काही वर्षानंतर ऐतिहासिक दस्ताऐवज ठरते. त्या–त्या काळातील विचार प्रवाह, सामाजिक ज्वलंत समस्या, विविध नेत्यांचे विचार त्यातून प्रकट झालेले दिसतात. उदा. १८७५च्या सुमारास स्त्री शिक्षणविषयक विचार पुनर्विवाह व बालविवाह यासंदर्भातील उलट–सुलट विचार प्रवाह दिसून येतात. लोकशिक्षण देण्यात वर्तमान पत्राचा वाटा महत्त्वाचा आहे.

वर्तमानपत्रात मुख्य बातम्या, देश–विदेशातील बातम्या, संपादकीय, क्रीडा वृत्त, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रातील ताज्या घटनांचा समावेश होतो. तसेच, वाचकवर्गाच्या आवडीनुसार विविध प्रकारची नवनवीन सदरे (उदा. आरोग्य, शेअर बाजार, सौंदर्यवर्धक मार्गदर्शन, ललित लेखन, दैनंदिन भविष्य आदी) यांचाही समावेश असतो. त्यापैकी संपादकीय मजकुर हा तत्कालीन राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक घडामोडीवर टीका–टिप्पणी करणारा व वृत्तसमूहाचे मतप्रदर्शन घडविणारा असतो. वर्तमानपत्र हे प्रामुख्याने ताज्या बातम्यांसाठी वाचले जाते. संपादकीय विभाग हा प्रामुख्याने संपादक सांभाळतात. विविध क्षेत्रांतील माहिती त्या–त्या क्षेत्रातील तज्ज्ञांकडून मागविली जाते. नेहमी घडणाऱ्या घटनांपेक्षा वेगळी घटना घडली म्हणजे तिला 'बातमी' म्हणता येते. उदा. वीजप्रवाह खंडित होणे ही नित्याचीच बाब आहे. मात्र दीर्घकाळ विद्युतप्रवाह खंडित झाल्यामुळे त्यावर अवलंबून असलेले अनेक व्यवहार ठप्प होऊन कामाचा खोळंबा झाल्यास त्याची बातमी होते. दहावी–बारावीच्या परीक्षेच्या दिवसांत रात्री असे घडले तर विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर त्याचा विपरित परिणाम होतो, हासुद्धा बातमीचा विषय आहे.

वर्तमानपत्रातील बातमीतून ताजेपणाची अपेक्षा असते. रिवाजापेक्षा वेगळी घटना लक्ष वेधते. पण त्यात नवेपणा पाहिजे. अनेक दिवसांपूर्वी घडलेली घटना लक्ष वेधू शकत नाही. क्रिकेटचे सामने, निवडणुकांचे निकाल यांसारख्या घटना व प्रसिद्ध व्यक्तिंच्या व्यक्तिगत जीवनातील घडामोडी याविषयी सर्वसामान्यांच्या मनात प्रचंड कुतुहल असते. त्याची पूर्तता करणारी माहिती ही बातमी होऊ शकते. थोडक्यात, ''रूढ घटनांपेक्षा वेगळी ताजेपणा असणारी कुतूहल उत्पन्न करणारी घटना म्हणजे बातमी'' असे म्हणता येईल.

भारतीय भाषांमधून निघालेल्या पहिल्या वृत्तपत्रांची सुरूवात ही सामाजिक भूमिकेतून झालेली दिसते. ४ डिसेंबर १८२१ साली डॉ. राजाराम मोहन रॉय यांनी बंगाली भाषेतून 'संवादकौमुदी' हे वर्तमानपत्र काढले. सनातनी जीवनपध्दती कठोरपणे स्वीकारणारा आणि त्यानुसार रुढी–परपरा अवलंबिणारा सनातनी हिंदु समाज आणि त्याला विरोध करण्याची नवी जाणीव, नव्या ज्ञानाची आस आणि लोकजागृती साधन म्हणून वृत्तपत्राकडे पाहणारे रॉय यांची भूमिकाही सामाजिकच होती. त्यानंतर अनेक भारतीय भाषांमधून वृत्तपत्रे निघाली व लोकशिक्षणातून सुरू झालेली ही वाटचाल लोकांच्या हक्कांपर्यंत येवून पोहोचली.

मराठी वर्तमानपत्राची निर्मितीही सामाजिक भूमिकेतून झाली. जानेवारी १८३२ मध्ये बाळशास्त्री जांभेकरांनी 'दर्पण' वर्तमानपत्र प्रसिध्द केले. त्यानंतर मराठी वृत्तपत्रांची उज्ज्वल कारकीर्द सुरू झाली. 'मुंबई अखबार', 'प्रभाकर धुमकेतू', 'ज्ञानप्रकाश', 'ज्ञानोदय', 'दीनबंधू' वगैरे अनेक वर्तमानपत्रांनी कमी–अधिक प्रमाणात सामाजिक सुधारणेचा पुरस्कार केला. 'केसरी', 'सुधाकर', 'इंदुप्रकाश', 'मुकनायक', 'बहिष्कृत भारत' या वर्तमानपत्रांनी सामाजिक सुधारणांचा भक्कमपणे पुरस्कार केला. 'केसरी'ने सामाजिक अंगाने लिहुन जनजागृती घडविली. राजकीय स्वातंत्र्याचा जोमाने पुरस्कार केला. आगरकरांनी 'सुधारक'मधून सामाजिक सुधारणांना सातत्याने प्रोत्साहन दिले.

सनातनी विचारांना त्यांनी सतत विरोध दर्शविला तर 'मुकनायक' व 'बहिष्कृत भारत'मधून बाबासाहेबांनी दलित आणि शुद्र समाजाला विषमाधिष्ठीत समाज व्यवस्थेतून मुक्त करण्याची आकांक्षा बाळगली.

'सकाळ'ने वर्तमानपत्रांचे नवे युग आणले. त्यांनी राजकीय हालचाली समाजातील मतमतांतरे यापलिकडे जाऊन लोकांच्या चिंतेचे–चर्चेचे, आशा–आकाक्षांचे विषय बातमीचे विषय बनविले. वाचकांना चांगली व ताजी बातमी देणे याबरोबरच लोकशिक्षणाचा हेतु त्यांनी स्पष्टपणे ठेवला आणि लोकांच्या जीवनात 'सकाळ' आणली. सकळांच्या जीवनात लोकांचे प्रश्न उभे केले. आणि त्यावर उत्तरे शोधण्याचा प्रयत्न केला.

एकुणच, या काळात वर्तमानपत्राचे जग बातमीकडे वळले. वृत्तपत्राचे जग आज १९९१ पासून सुरू झालेल्या नव्या आर्थिक धोरणाच्या आणि इलेक्ट्रॉनिक्स् माध्यमांच्या आक्रमणातून पुढे येण्याचा प्रयत्न करीत आहे. १९९० नंतर नवे तंत्रज्ञान, रंगीत छायाचित्रे, मुद्रणातील सुकरता यामुळे वृत्तपत्रांच्या क्षेत्रात मोठी क्रांतीच झाली. अंक देखणे व आकर्षक दिसू लागले. केवळ दैनंदिन अंकच नव्हे तर सोबतच्या पुरवण्याही रंगीत, आकर्षक बनल्या. त्यामुळे नवनवे विषय वाचकांपर्यंत पोहोचविले गेले. मांडणीतही आकर्षकता आली. दळणवळणाच्या तंत्रातही आश्चर्यकारक बदल झाले. या सर्वांचा परिणाम वर्तमानपत्र अधिक चैतन्यपूर्ण व टवटवीत दिसण्यावर निश्चितच झाला.

तत्पूर्वी १९७५ च्या दरम्यान आपले समाजजीवन वेगाने बदलत गेले. समाजाच्या अगदी कोपऱ्यातल्या आणि तळागाळातल्या आकांक्षांना मोहोर फुटले. या सर्वांना समजावून घेत त्यांच्या आकांक्षाचे प्रतिबिंब वर्तमानपत्रातून कसे दाखविता येईल, याचा वृत्तपत्रे विचार करु लागली. दलित–वंचित–उपेक्षित वर्गाच्याप्रति असलेली संवेदना लक्षात घेत समाजाला सक्रिय करणे ही वर्तमानपत्राच्या जगातली विकसित होत गेलेली नवी जाणीव तेव्हा होती. बालमजुरी, बालमृत्यू, दुष्काळग्रस्त लोकांचे प्रश्न, दारिद्रय रेषेखाली जगणाऱ्यांसाठीच्या सरकारी योजना, निराधार–वयस्करांचे प्रश्न, परितक्त्या स्त्रियांच्या समस्या, अत्याचारित घटकांसाठी मदतीचे आवाहन हे सगळे विषय या नव्या जाणिवेने वर्तमानपत्रात येत आहेत. यातून फार मोठी सामाजिक सहानुभूती निर्माण करण्याचा प्रयत्न होतो आहे.

१९७५ नंतर जागतिक स्तरावर महिलांच्या प्रश्नांना प्राधान्याने विचारात घेतले जावू लागले. त्याची दखल घेवून अनेक वृत्तपत्रांनी महिलांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी व्यासपीठ म्हणुन स्वतंत्र स्तंभ सुरु केले. उदा. 'सखी', 'मैत्रीण', 'कुटूंब', 'चतुरंग' अशा शीर्षकाने काही नवे स्तंभ व नव्या पुरवण्या सुरू झालेल्या दिसून येतात. अलीकडे तर वर्तमानपत्राचे रंगरुपच पालटले आहे. फॅशन–नवी वस्त्रे–सौंदर्य साधने, लैंगिकतेचे प्रश्न, कुटुंबातले ताण–तणाव, चित्रपट, टि.व्ही. मालिका, माहिती देणारे लेखन या सर्वांकडे भरभरुन लक्ष दिले जाऊ लागले. मुलांचे मन रमविणारे छोटे खेळ आणि चित्रकथा यांचा वापर वृत्तपत्रांनी नियमितपणे सुरु केला. विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या जीवनात शैलीकडे लक्ष वेधणाऱ्या लेखनाला विशेष स्थान देण्यात आले. व्यक्तिमत्त्व विकासाचे अनेक पैलू वृत्तपत्रांनी या काळात वाचकांना देण्याचा प्रयत्न केला आहे. 'सकाळ'ने २००० साली 'युवा सकाळ' सुरु केले. पत्रकारितेत हा एक वेगळा प्रयोग होता. वैशिष्टयपूर्ण बातम्या, आकर्षक छायाचित्रे, युवा मित्रांची मनोगते व्यक्त करणारे स्तंभ यांचा त्यात समावेश होता. याखेरीज 'अर्थमंथन' हे आर्थिक घडामोडींचा वेध घेणारे तसेच अगदी अलीकडे 'ॲग्रोवन' दैनिक त्यांनी सुरू करुन शेती क्षेत्रालाही वृत्तपत्रांमध्ये मोलाचे स्थान दिले. शेती, शेअर बाजार, गुंतवणुक या विषयांवरील चांगले मार्गदर्शन यानिमित्ताने केले जाते आहे.

वृत्तपत्रांच्या विषयांमध्ये अलीकडे आणखी एक नाविन्यपूर्ण बदल होतांना दिसतो. या क्षेत्रात आर्थिक घडामोडीत स्थान असणाऱ्या बातम्यांना स्थान देणे, महत्त्वाच्या आर्थिक उलाढालीतील केंद्र व राज्य सरकारांनी करदाते असलेल्या वर्गांची दखल घेणे यादृष्टीने हे बदल झाल्याचे दिसते. उदा. प्राप्तीकरदात्यांची लक्षणीय संख्या पाहता त्यांच्यासाठी मार्गदर्शनपर स्तंभ सुरु झालेले दिसतात. अलीकडच्या काळातील वर्तमानापत्रांच्या आणखी एक पैलु म्हणजे विधीमंडळ आणि संसदेतील कामकाजाचे झालेल्या ठरावांचे, वादविवादाचे चित्रण नियमितपणे देणे. विधानसभा, विधान परिषद, लोकसभा, राज्यसभा या सदनांमध्ये चाललेल्या कामकाजाचे ताजे वृत्तांकन रोजच्या

Indian Journal(s) of Research Studies (IJORS) in Languages & Literature [ISSN: 2321-0133 (Print)]
[Volume II, Issue 1& 2] [January –April, 2014]

रोज दैनिकांमधून पुरेशा तपशिलासह दिले जाते. आज भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी लोकशाही आहे. या लोकशाहीचे कार्यपालिका, संसद आणि विधीमंडळ न्यायपालिका या तीन मुलाधारांचे काम वृत्तपत्रांना आवर्जून लक्षात घ्यावे लागते. म्हणून घटनाकारांनी वृत्तपत्रांना लोकशाहीच्या चौथ्या आधारस्तंभ मानले आहे. वृत्तपत्रांच्या सामर्थ्याचे आणि मूल्याधारित समाज–उभारणीचे सूचन त्यातून होते.

वर्तमानपत्रामध्ये नव्या जाणिवा निर्माण झाल्याचे दिसतात. मोठी धोरणे आली. नवे खुले आर्थिक धोरण आले आणि विस्थापित, वंचित वर्गाच्या जगण्याची चिंता वाढली. ही चिंता व्यक्त करणारी आंदोलनं वर्तमानपत्रांनी व्यापक स्वरुपात समाजासमोर आणली. नवे युग, नवे जागरण, नव्या फॅशन्स, नवनव्या डिझाईन्स् देत असतानाच झोपडपट्टयांमधून आणि आपल्या मालकीच्या जमिनीवरुन शेतीवरून उठवले जाणारे वर्ग हे ही आपल्या वार्ताकनांच्या परिघात सामावून घेतले. हे ही वृत्तपत्रांचे मोठे कार्य आहे. यशाचे सर्वोच्च शिखर गाठणाऱ्या हुशार विद्यार्थ्याइतकीच दखल नापास होणाऱ्या विद्यार्थ्यांचीही घेण्याची मानसिकता समाजात, घरात व पालकांमध्ये निर्माण करण्याचा प्रयत्न वर्तमानपत्रांनी केला आहे. नेहमीचे पारंपरिक वर्तन छेदत सर्व समाजाला दिशा देण्याचा खराखुरा प्रयत्न वर्तमानपत्रांनी सुरू केला आणि 'मिडीया' हे आपले बिरूद सार्थपणे टिकवून ठेवले.

वर्तमानपत्राची भूमिका लोकशाहीला बळ देणारी आणि समाजाला उभारणीची असली पाहिजे. बदलते वातावरण, जीवनशैली, लोकशाहीची मूल्ये, त्यांचा विकास, देशाच्या प्रतिनिधीत्वाने स्वीकारलेली विज्ञानवादी दृष्टी यामुळे भारतीयांचे क्षितिज विस्तारत आहे. नवे प्रश्न, नवी संकटे, नवी आव्हानं यांची प्रामाणिकपणे दखल घेण्याचा प्रयत्न अनेक वृत्तपत्रांनी केला आहे. जातीधर्माच्या/भाषेच्या प्रश्नांवरील दंगली, भुकंपासारखी संकटे, दहशतवादाची समस्या, मोठमोठया नेत्यांच्या हत्या, संसदेवरील हल्ला, अन्नधान्याची टंचाई, दुष्काळाचे चटके त्यामुळे ग्रामीण भागातुन झालेले स्थलांतर, रोजगार हमी योजनेची कामे असे अनेक संदर्भाचे लेखन करून वर्तमानपत्रांनी आपली सामाजिक बांधीलकी टिकवून ठेवण्याच्या प्रयत्न केला आहे. आजचे युग जाहिरात युग आहे. मुद्रित माध्यमांना जाहिरातींमुळे आर्थिक बळ मिळते. त्यामुळे मुद्रित माध्यमांना व्यापणारा हा घटक आहे.

"जो बोलेल त्याचे हुलगेही खपतात पण जो बोलणार नाही त्याचे गहुही खपत नाहीत." या आशयाचे विधान आपण बऱ्याच वेळा ऐकतो. जाहिरातीचे माध्यम कशा प्रकारचे आहे, त्याची क्षमता आणि उपयोजन कसे होते, यांचे निर्देशन करणारे हे विधान आहे. जाहिरात म्हणजे लोकांना प्रभावीपणे माहिती देवून आपली वस्तू विकण्याचे कौशल्य होय. वर्तमानपत्रातील जाहिरातीला विशेष महत्त्व असते. स्थळ–काळ–वेळेचे भान ठेवून जाहिरात प्रसिध्द केली जाते. वर्तमानपत्रांच्यादृष्टीने नवनवे विषय वाचकांना समजावून देणे हा प्रसाराचा महत्त्वाचा घटक असतो. म्हणूनच पुस्तके–खेळ–कला–संगीत–चित्रपट–शिल्पकला–चित्रकला इत्यादी विषयांवर आधारित समीक्षणात्मक लेखन वर्तमानपत्रात सादर होताना दिसते. या वर्तमानपत्रीय समीक्षणात्मक लेखनात सर्वात महत्त्वाचे आहे ते ग्रंथपरीक्षण! वर्तमानपत्राचा, जगाचा आणि पुस्तक विश्वाचा अनोन्यसंबंध आहे. परिणामी, नवनवीन पुस्तकांचे समीक्षणात्मक परीक्षण प्रसिध्द केले जाते. उदा. मराठी वृत्तपत्रांनी रविवारच्या पुरवणीला मोठया प्रमाणात वाङ्.मयीन रुप दिले. त्यातील सर्वात महत्त्वाचा घटक म्हणून ग्रंथ परीक्षणाच्या स्तंभाचा उल्लेख करावा लागेल.

नवा वाचक मिळविणे आणि सर्वसामान्य वाचकांची रुची अधिक संपन्न करणे, या दृष्टींनी वर्तमानपत्रात नाटक, चित्रपट आणि खेळ यांच्या समीक्षेलाही विशेष महत्त्व आले आहे. त्याचेही दर्शन वृत्तपत्रात होते, ही निश्चितच स्वागतार्ह बाब आहे.

**संदर्भ ग्रंथ:**

१. व्यावहारिक मराठी: प्रा. डॉ. सयाजीराजे मोकाशी, प्रा. सौ. रंजना नेमाडे
२. व्यावहारिक उपयोजित मराठी आणि प्रसारमाध्यमे: डॉ संदिप सांगळे

• • •